# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 10 April 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १० एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज नागपूर जिल्ह्यातल्या रामटेक इथं प्रचारसभा होणार आहे. रामटेक लोकसभा मतदारसंघातून शिवसेना शिंदे गटाचे राजू पारवे हे महायुतीचे, तर काँग्रेसचे श्याम बर्वे हे महाविकास आघाडीचे उमेदवार आहेत.

दरम्यान, बहुजन समाज पार्टीच्या अध्यक्ष मायावती उत्तर नागपूरमधल्या इंदोरा इथं उद्या जाहीर सभा घेणार आहेत.

****

येत्या लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात दोन हजार ६४१ नवीन मतदान केंद्रं वाढली असून, एकूण केंद्रांची संख्या ९८ हजार ११४ इतकी झाली आहे. मतदारांची नोंदणी सुरु असल्याने या मतदान केंद्रांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. सर्वांत जास्त आठ हजार ३८२ मतदान केंद्रं यावेळी पुण्यात असून, सर्वांत कमी मतदान केंद्रे सिंधुदुर्ग आणि गडचिरोलीमध्ये आहेत. सात जिल्हयात तीन हजारापेक्षा जास्त केंद्रं, दहा जिल्ह्यांमध्ये दोन हजाराहून अधिक, तर १२ जिल्ह्यांमध्ये दोन हजारापेक्षा कमी मतदान केंद्रं आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगानं जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर किमान मूलभूत सुविधा असणं बंधनकारक आहे. दुर्गम भागात असलेल्या मतदान केंद्रांवर विशेष काळजी घेण्यात येणार आहे.

****

आगामी निवडणुकीत दिव्यांग आणि वृद्ध मतदारांना घरुनच मतदान करण्याची सोय निवडणूक आयोगानं उपलब्ध करुन दिली आहे. महाराष्ट्र – तेलंगणा सीमेवर असलेल्या महाराजगुडा इथल्या सुरेखा राठोड या ४० वर्षीय दिव्यांग महिलेनं गृह मतदानाची इच्छा व्यक्त केली होती. गावात एकमेव दिव्यांग असलेल्या सुरेखा यांचं मत घेण्यासाठी जीवती तालुक्यातलं पथक गेल्या सोमवारी दाखल झालं. त्यांनी

आपलं मत घरातच स्थापन केलेल्या मतदान कक्षात बसूनच नोंदवलं आणि मतपत्रिका लिफाफ्यामध्ये टाकून अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केली. त्योसोबतच या पथकाने राज्याच्या सीमेवरील नारपठार या गावातल्या तीन वयोवृद्ध नागरिकांचंही गृहमतदानाद्वारे मत नोंदवलं.

****

लोकसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानं आज आणखी दोन उमेदवारांची घोषणा केली. सातारा मधून शशिकांत शिंदे यांना, तर रावेर मधून श्रीराम पाटील यांन उमेदवारी देण्यात आली आहे.

****

जागतिक होमिओपॅथी दिनानिमित्त नवी दिल्ली इथं आयोजित होमिओपॅथिक परिषदेचं उद्घाटन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज झालं. "संशोधनाचं सक्षमीकरण, नैपुण्य वाढ" ही या अधिवेशनाची संकल्पना आहे. दोन दिवस चालणाऱ्या या अधिवेशनात अनुवादात्मक संशोधन, संशोधन आणि सराव, महामारी आणि सार्वजनिक आरोग्य, होमिओपॅथिक औषध मानकीकरण आणि मूलभूत संशोधन, या विषयांवर विविध सत्र होणार आहेत.

****

यावर्षी जारी करण्यात आलेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या जागतिक कावीळ अहवालानुसार, कावीळ संसर्गामुळे होणार्या मृत्यूंच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. कावीळ संसर्गामुळे जगभरात दर दिवशी तीन हजार ५०० मृत्यू होत असून, जगभरात दरवर्षी १० लाखाहून अधिक मृत्यू होत असल्याचंही आरोग्य संघटनेच्या या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. हा मृत्यूदर पाहता आगामी काळात कावीळ संसर्ग रोखण्यासाठी ठोस पावलं उचलण्याची गरज जागतिक आरोग्य संघटनेनं व्यक्त केली आहे.

****

ज्येष्ठ पत्रकार प्रमोद माने यांच्या पार्थिव देहावर आज सकाळी छत्रपती संभाजी नगर इथं अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पत्रकारितेसह राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक तसंच सामाजिक क्षेत्रातल्या अनेकांनी माने यांचं अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली अर्पण केली. माने यांचं काल दीर्घ आजाराने हैदराबाद इथं निधन झालं, ते ६१ वर्षांचे होते.

****

कॅनडामध्ये टोरंटो इथं सुरु असलेल्या कँडिडेट्स टुर्नामेंट्स बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या डी गुकेश यानं पाचव्या फेरीत विजय मिळवला. तर भारताचे दुसरे खेळाडू प्रज्ञानंदा आणि विदित गुजराती यांनी विरोधी खेळाडुंना बरोबरीत रोखलं.

****

हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी शहरासह परिसरात काल रात्री झालेल्या वादळी वारा आणि गारपिटीने जटाळवाडी इथल्या एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. देवराव बाभळे असं त्यांचं नाव नाव असून, ते ६५ वर्षांचे होते. गाराच्या मारामुळे हृदय विकाराच्या झटक्याने त्याचा मृत्यू झाल्याचं नायब तहसीलदार आनंदराव सुळे यांनी सांगितलं. कनका इथं गारपिटीच्या तडाख्याने एक गाय अन् चार शेळ्या देखील दगावल्याचं वृत्त आहे. वादळी वारा आणि गारांच्या पावसामुळे पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं. गारपिटीने नुकसान झालेल्या भागाचं सर्वेक्षण करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना तहसीलदार सुरेखा नांदे यांनी तलाठ्यांना दिल्या आहेत. सेनगाव तालुक्यात काही ठिकाणी गारांचा पाऊस झाला. वसमत तालुक्यातही अवकाळी पावसामुळे केळी पिकाचं मोठं नुकसान झालं.

****

मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आजपासून पुढील चार दिवस वादळी वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही १३ तारखेपर्यंत अशाच पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

****